वाचले :- १) महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्ती वेतन) नियम -१९८२ मधील नियम १०(१).
२) अधिकार प्रदान आदेश क्र.प्रशा/२/कावि/४४७/१५ दिनांक २०/१०/२०१५
३) मुख्याध्यापक,माध्यमिक विद्यालय थेरगाव यांचे दि.१२/०१/२०१७ रोजीचे पत्र
४) मा.लेखाधिकारी यांचेकडील दि.२७/१०/२०१७ रोजीचे घरबांधणी अग्रीम नाहरकत प्रमाणपत्र.
५) मा.शिक्षणाधिकारी यांचेकडील दि. 20 / 01 /२०१७ रोजीचा मान्य प्रस्ताव.

---

पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी – ४११ १०८.
माध्यमिक शिक्षण विभाग
क्र. माध्य/शि/१/कावि/108 /२०१७
दिनांक :- 20 / 01 /२०१७

विषय :- नियत वयोमानानुसार सेवानिवृत्तीबाबत.
श्री.एकशिंगे विठ्ठल हरिभाऊ पदनाम-मुख्याध्यापक
(संगणक क्र. ५९५५)

आदेश,

**श्री.एकशिंगे विठ्ठल हरिभाऊ** हे पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील मुख्याध्यापक या गट ब मधील पदावर माध्यमिक विद्यालय थेरगाव येथे कामकाज करीत आहेत. दिनांक २२/१/१९८६ रोजी ते म.न.पा.मध्ये उपशिक्षक पदावर रूजू झालेले आहेत. त्यांच्या सेवानोंद पुस्तकामधील नोंदीनुसार त्यांची जन्मतारीख ०३/०२/१९५९ आशी असून,दिनांक ०२/०२/२०१७ रोजी त्यांच्या वयास ५८ वर्ष पूर्ण होत आहेत.

महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्ती वेतन) नियम -१९८२ मधील नियम १०(१).नुसार गट ब मधील कर्मचा-यांना वयाची ५८ वर्षे पूर्ण होतील त्या महिन्याच्या शेवटच्या तारखेस नियत वयोमानानुसार मध्यान्होत्तर सेवानिवृत्त करणे आवश्यक आहे.

**श्री.एकशिंगे विठ्ठल हरिभाऊ, मुख्याध्यापक** यांनी म.न.पा.चे घरबांधणी कर्ज, वाहन कर्ज,संगणक कर्ज येणे बाकी नसलेबाबत दाखले सादर केले आहेत. त्यानुसार त्यांचेकडे कोणत्याही प्रकारचे कर्ज बाकी नसलेचे निदर्शनास येत आहे.तसेच त्यांचे नांवे माध्यमिक शिक्षक सहकारी पतपेढीचे कर्ज बाकी नाही. श्री.एकशिंगे विठ्ठल हरिभाऊ, मुख्याध्यापक यांना सेवासातत्य देण्यात आलेले आहे. तसेच त्यांचे विरूध्द कोणत्याही प्रकारची खातेनिहाय चौकशी चालु अथवा प्रस्तावित नाही असे सेवानोंद पुस्तकाचे अवलोकन केले असता निदर्शनास येते.

**श्री.एकशिंगे विठ्ठल हरिभाऊ, मुख्याध्यापक** यांना सेवासातत्य दिले असल्याने त्यांचे संदर्भात भविष्यात लेखा परिक्षणाची वसुली निघाल्यास त्याची संपूर्ण रक्कम संबंधिताचे निवृत्ती वेतनामधून वसूल करणेस अधिन राहून रूजू दिनांक १३/०६/१९८३ या प्रमाणे नोंद घेणेत यावी.

सबब, मी **शिक्षणाधिकारी, माध्यमिक शिक्षण विभाग, पिंपरी-चिंचवड महानगरपालिका, पिंपरी १८** उपरोक्त वाचले क्र.२ अन्वये विभागप्रमुख म्हणुन मला प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्ती वेतन)नियम १९८२ मधील तरतूदी नुसार या आदेशान्वये श्री.एकशिंगे विठ्ठल हरिभाऊ, मुख्याध्यापक यांना दि.२८/०२/२०१७ रोजी मध्यान्होत्तर महापालिका सेवेतून नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त करणेस या आदेशान्वये मान्यता देण्यात येत आहे.

प्रस्तुत आदेशाची नोंद **श्री.एकशिंगे विठ्ठल हरिभाऊ, मुख्याध्यापक** यांचे सेवानोंद पुस्तकात घेण्यात यावी.

Kamble
20/1/17
प्र.शिक्षणाधिकारी
माध्यमिक शिक्षण विभाग
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी – ४११ ०१८

प्रती,

श्री.एकशिंगे विठ्ठल हरिभाऊ
मुख्याध्यापक माध्यमिक विद्यालय थेरगाव

प्रत :- १) लेखा विभाग
२) प्रशासन,कर्मचारी वैयक्तिक नोंद कक्ष,संगणक कक्ष (प्रशासन)
सेवाजेष्ठता कक्ष,मागासवर्गीय कक्ष,कामगार कल्याण विभाग
३) माध्यमिक विभाग टेबल क्र. २ व ४
४) माध्यमिक विद्यालय थेरगाव
२/- पुढील कार्यवाहीसाठी.

Scanned with CamScanner